| | |
|---|---|
| दावा दाखल तारीख | ०१.०१.२०१८ |
| दावा नोंद तारीख | ०१.०१.२०१८ |
| निकालाची तारीख | १०.०४.२०१९ |
| दाव्याचा कालावधी | व. म. दि. |
| | ०१ ०३ ०९ |

# दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) शिंदखेडा यांच्या न्यायालयात.

(पीठासीन अधिकारीः दस्तगीर रा. पठाण).

**नियमित दिवाणी दावा क्र.०१/२०१८.** **नि.क्र.**

रामभाउ दौलत मराठे.
उ.व.६८ वर्षे, धंदा – शेती.
रा.अजंदे खुर्द, ता. शिंदखेडा, जि.धुळे. .... वादी.

**विरुध्द**

०१. सुमनबाई गुलाब मराठे.
उ.व. ६० वर्षे, धंदा. घरकाम.

०२. गोविंदा गुलाब मराठे.
उ.व. ४० वर्षे, धंदा. शेती,

०३. जगदिश गुलाब मराठे.
उ.व. ३५ वर्षे, धंदा. शेती.
प्रतिवादी क्र.०१ ते ०३
रा.अजंदे खुर्द, ता. शिंदखेडा, जि.धुळे.

०४. सौ. गायत्री विजय मराठे.
उ.व. ३२ वर्षे, धंदा. घरकाम.
द्वारा. विजय तुकाराम मराठे.

०५. सौ. शितल सुरेश मराठे.
उ.व. ४१ वर्षे, धंदा. घरकाम.
द्वारा. सुरेश तुकाराम मराठे.
प्रतिवादी क्र.०४ व ०५ रा. बुडीगव्हाण,
ता. शहादा, जि. नंदुरबार.

०६. मंजुळाबाई बाबुराव मराठे.
उ.व. ७० वर्षे, धंदा. घरकाम.
द्वारा. संजय बाबुराव मराठे.
रा. गोंडगाव, ता. भडगांव, जि. जळगांव. ... प्रतिवादी.

०७. धुळे जिल्हा भु.विकास बँक, शाखा नरडाणे,
तर्फे शाखा व्यवस्थापक, धुळे जिल्हा
भु.विकास बँक, नरडाणा, ता. शिंदखेडा. .... प्रतिवादी.

.......................................................................................................................

| | | |
|---|---|---|
| श्री. बि. झेड. मराठे | – | वादीतर्फे विधिज्ञ. |
| श्री. एन. बी. मराठे | – | प्रतिवादीं क्र.०१ ते ०५ तर्फे विधिज्ञ. |
| एकतर्फा | – | प्रतिवादीं क्र.०६ व ०७ करीता. |

.......................................................................................................................

## :: न्यायनिर्णय ::

(पारीत दिनांक १० एप्रिल २०१९)

०१. वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीच्या वाटणीकरीता, त्याचा वाटप होवून कब्जा मिळणेकरीता व कब्जा मिळेपर्यंत दरम्यानचे उत्पन्न मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. वादीचे थोडक्यात कथन असे की, मौजे अजंदे खुर्द, ता.शिंदखेडा, जि.धुळे येथील गट क्र.१८०, याचे क्षेत्र ०१ हेक्टर ९३ आर, आकारणी रु.११.८० पैसे ही शेतजमिन या दाव्याचा विषय असुन, यापुढे तिला 'दावा मिळकत' असे संबोधले आहे.

०३. वादीचे पुढील कथन की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादींची वडिलोपार्जीत मिळकत आहे. दौलत नथ्थु मराठे हे वादीचे वडिल होते, ते दि.२२/०३/१९९० रोजी मयत झालेले आहेत. गुलाब दौलत मराठे हे वादीचे मोठे भाउ होते, ते मयत झाले असून प्रतिवादी क्र.०१ ते ०५ हे त्यांचे वारस आहेत, प्रतिवादी क्र.०६ ही गुलाब दौलत मराठे यांची बहिण आहे. वादीचे वडिल दौलत नथ्थु मराठे हयांचे मृत्युनंतर वादी व वादीचे मोठे भाउ गुलाब दौलत मराठे यांची नावे वारसा हक्काने दावा मिळकतीला लागलेली आहेत. वादी व गुलाब दौलत मराठे यांनी कौटुंबिक व्यवस्था म्हणून वादीला दावा मिळकतीपैकी पुर्वे कडील अडीच बिघे क्षेत्र खाण्याकरीता ताब्यात दिले आहे. प्रतिवादी क्र.०६ मंजुळाबाई ही वादीची बहिण असुन ती सासरी सुखाने आहे, वादी व मयत गुलाब नथ्थु मराठे यांनी तिला तिच्या दावा मिळकतीमधील हिश्याबददल सण समारंभाच्या वेळी

रोख, दागीने देवून तिला तिचा मिळकतीमधील हिस्सा दिलेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये तिचा हिस्सा राहिलेला नाही. तांत्रीक अडचण राहु नये म्हणून तिला प्रतिवादीपणात सामील केले आहे. तसेच दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याला प्रतिवादी क्र.०७ चे नाव गहाणाबददल दिसत आहे, परंतु प्रतिवादी क्र.०७ यांचे दावा मिळकतीवर काहीएक घेणे राहिलेले नाही, तर ७/१२ उता–यातुन प्रतिवादी क्र.०७ चे नाव कमी करावयाचे राहुन गेले आहे. तांत्रीक अडचण राहु नये म्हणून प्रतिवादी क्र.०७ ला प्रतिवादीपणात सामिल केले आहे.

०४. दावा मिळकत वादी व प्रतिवादीं क्र. ०१ ते ०६ यांची वडिलोपार्जीत मिळकत असून अद्याप त्यांच्यामध्ये सरस निरस मानाने वाटणी झालेली नाही. दावा मिळकतीमध्ये वादीचा निम्मे हिस्सा आहे. वादी याने त्याचे वडिल भाउ मयत झाले नंतर प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांना दावा मिळकत एकत्रात राहु देणे नाही, वाटणी करुन ज्याच्या त्याच्या नावाने सातबारा उतारा करुन दया असे सांगितले असता, प्रतिवादींनी दावा मिळकतीची वाटणी व खातेफोड करण्यास टाळाटाळ केली व वाटणी देण्यास नकार दिला. त्यामुळे वादीने दि.०६/१२/२०१७ रोजी त्याचे वकीलामार्फत प्रतिवादीला नोटीस देवून दावा मिळकतीमधील त्याच्या निम्मे हिश्याची मागणी केली असता, प्रतिवादींनी नोटीस घेण्यास नकार दिला. सबब वादीने दावा मिळकतीमधील त्याचा निम्मे हिस्सा पृथक करुन वाटणीने त्याच्या ताब्यात मिळावा व दरम्यानचे उत्पन्नासाठी प्रस्तुताचा दावा दाखल केलेला आहे.

०५. प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांनी या कामी हजर होवुन त्यांची कैफियत दाखल केली नाही, त्यामुळे त्यांच्याविरुध्द दाव्याचे काम विनाकैफियत चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला. तसेच प्रतिवादी क्र.०६ व ०७ यांना दाव्याचे समन्साची बजावणी होवूनही ते हजर झाले नाहीत, त्यामुळे त्यांच्याविरुध्द दाव्याचे काम एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

०६. यातील दावा व पुराव्यातील कथनांवर विसंबुन खालील प्रमाणे वादप्रश्ने निर्माण होतात, ते मी येथे नमुद करुन त्यांचे निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे,

| अ.क्र. | वादप्रश्ने | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| ०१. | वादी सिध्द करतो काय की, दावा मिळकत ही त्याची वडिलोपार्जीत मिळकत आहे ? | .... | होय. |
| ०२. | वादी सिध्द करतो काय की, दावा मिळकतीत त्याचा निम्मा हिस्सा आहे ? | .... | अंशतः होय. |
| ०३. | वादी सिध्द करतो काय की, त्याने मागणी केलेल्या मागण्या मागण्यास तो पात्र आहे काय ? | .... | होय. |
| ०४. | आदेश काय ? | .... | दावा खर्चासह अंशतःमंजुर करण्यात येतो. |

## :: कारणमिमांसा ::

**वादप्रश्ने क्र.०१ ते ०३ करीता** :

०७. सदरील वादप्रश्न हे एकमेकांशी संलग्न असल्याने व चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतरित्या चर्चेकरीता घेतलेले आहेत. आता, या मुद्दयांमध्ये प्रथमतः यातील वादीने दावा मिळकत ही त्यांची एकत्र कुटूंबाची वडिलोपार्जीत मिळकत आहे ही बाब सिध्द केली आहे किंवा कसे हे पाहणे गरजेचे आहे?

०८. त्या अनुषंगाने वादी हा त्याच्या स्वतःच्या जबाबावर विसंबुन आहे. त्याच्या जबाबास सुसंगत करण्याकरीता त्याने दावा मिळकतीचा ७/१२ उतारा (नि.क्र.२०) व फेरफार क्र.१७५१ चा उतारा (नि.क्र.२७) यावर विसंबुन आहे. आता फेरफार क्र.१७५१ चा उतारा (नि.क्र.२७) प्रमाणे दावा मिळकत ही दौलत नथ्थु यांच्या पश्चात त्यांचे वारस म्हणून वादी, गुलाब मराठे व प्रतिवादी क्र. ०६ यांच्या नावाची नोंद झाल्याचे दिसते. त्याप्रमाणे या तिघांची नावे आज देखील दावा मिळकतीच्या अभिलेखात नमुद असल्याचे दिसतात. सदर कथनांना व वादीच्या पुराव्यास कोणत्याही प्रतिवादीने अव्हान दिलेले नाही. त्यामुळे सदरचा पुरावा हा विनाआव्हानीत असल्याने त्यावर विसंबुन

दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.०१ ते ०६ यांची वडिलोपार्जीत मिळकत असल्याचे स्पष्ट होत आहे.

०९. आता वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीत त्याचा निम्मा हिस्सा आहे तर निम्मा हिस्सा गुलाब मराठे यांचा हिस्सा आहे. परंतु दौलत नथ्थु यांना वादी, गुलाब मराठे व प्रतिवादी क्र.०६ असे सरळ वारस असल्याचे दिसतात. आता प्रतिवादी क्र.०६ बाबत वादीचे कथन की, तिचे लग्न होवून ती सासरी राहात आहे व तिच्या लग्नाचा व सणासुदीचा खर्च करण्यात आल्याने तिचा दावा मिळकतीत कोणताही हिस्सा राहिलेला नाही. आता प्रतिवादी क्र.०६ हिच्या लग्नाकरीता व सणासुदीच्या खर्चाकरीता वादीने किंवा त्याचा भाउ गुलाब याने काय खर्च केला याबाबत कोणताही पुरावा वादीने सादर केलेला नाही. तसेच यातील प्रतिवादी क्र.०६ हिने देखील न्यायालयात हजर राहुन तिने दावा मिळकतीत हिस्सा सोडल्याबाबत कथन केलेले नाही. अशा परिस्थितीत केवळ वादीच्या कथनांवर विसंबुन प्रतिवादी क्र.०६ हिच्या लग्नाचा व सणासुदीचा खर्च करण्यात आल्याने तिचा दावा मिळकतीत कोणताही हिस्सा राहिलेला नाही असे म्हणता येणार नाही. त्यामुळे दौलत नथ्थु यांच्या मृत्यु पश्चात वादी, गुलाब मराठे व प्रतिवादी क्र.०६ असे सरळ वारस असल्याने त्यांना दावा मिळकतीत समान हिस्सा म्हणजेच प्रत्येकी १/३ हिस्सा मिळणार आहे.

१०. वादीच्या कथनाप्रमाणे त्याने प्रतिवादी क्र.०१ ते ०३ यांच्याकडे त्याचा दावा मिळकतीतील हिस्सा मागितला, परंतु त्यांनी त्याला देण्यास टाळाटाळ केली म्हणून त्याने त्यांना नोटीस पाठविली, ती नोटीस त्यांनी घेण्यास नाकारले, त्यामुळे त्याने सदरचा दावा दाखल केला. याबाबत वादीने यातील प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांना पाठविलेली दि.०६/१२/२०१७ रोजीची नोटीस (नि.क्र.२२) याकामी हजर केली आहे. तसेच सदर नोटीस यातील प्रतिवादी क्र.०१, ०४ व ०५ यांना मिळाल्याबाबतच्या पोच पावत्या (नि.क्र.२५, २५अ व २६) हजर केल्या आहेत, तर प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांनी त्या घेण्यास नकार दिल्या याबाबत परत आलेले लाखेटे (नि.क्र.२४ व २४अ) हजर केले आहेत. याउलट सदर नोटीसांबाबत यातील प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांना माहिती असल्याचे दिसते. त्यानंतर याकामातील समन्स यातील प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांना मिळालेले

आहेत. असे असतांना देखील यातील प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांनी वादीचा हिस्सा दिलेला दिसत नाही. त्यामुळे वादीच्या कथनामध्ये काही अंशी तथ्य असल्याचे स्पष्ट होते.

११. आता वरील संपूर्ण चर्चेतुन ही बाब स्पष्ट झाली आहे की, दावा मिळकत ही वादी, गुलाब मराठे व प्रतिवादी क्र.०६ यांची वडिलोपार्जीत मिळकत आहे, त्यामध्ये त्यांना प्रत्येकी १/३ हिस्सा आहे. आता गुलाब मराठे हे मयत असल्याने, त्यामुळे त्यांचा हिस्सा हा प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांच्यामध्ये वाटप होणे जरुरीचे आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांना प्रत्येकी १/१५ हिस्सा दावा मिळकतीत आहे. तसेच सदर मिळकत ही सद्या प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांच्या ताब्यात असल्याने त्याचा तुटक वाटप होवून त्यातील वादीचा हिस्सा त्याला मिळणे न्यायाचे होणार आहे.

१२. याकामी वादीने दिवाणी प्रकिया संहिता आदेश २० नियम १२ प्रमाणे त्याचा हिस्सा त्याच्या ताब्यात मिळेपावेतो दरम्यानच्या उत्पन्नाची मागणी केली आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांच्या ताब्यात आहे, ते वादीचा हिस्सा देण्यास नकार देत आहेत, याठिकाणी वादी हा देखील सदर दावा मिळकतीचा सहहिस्सेदार आहे ही बाब शाबीत झाली आहे. त्यामुळे दावा मिळकतीतीतला त्याचा हिस्सा त्याला मिळेपावेतो त्याला दरम्यानचे उत्पन्न मिळणे न्यायाचे होणार आहे. तसेच वादीने दाव्यात मागणी केलेल्या मागण्या मागणेस तो अंशतः पात्र आहे असेच म्हणता येईल. सबब वादप्रश्न क्र.०१ व ०३ ची उत्तरे मी होकारार्थी देतो, तसेच वादप्रश्न क्र.०२ चे उत्तर मी अंशतः होकारार्थी देतो व माझी कारणे नोंदवीतो.

**<u>वादप्रश्न क्र.०४ करीता</u> :**

१३. सदरचा मुद्दा हा आदेशाकरीता आहे. वरील मुद्दयांतील चर्चेतुन ही बाब समोर आली आहे की, वादीने त्याच्या दाव्यातील कथने योग्य तो तोंडी व कागदोपात्री पुरावा देवुन सिध्द केलेला आहे. तसेच त्याच्या पुराव्यास कोणत्याही प्रतिवादीने आव्हान दिलेले नाही. त्यामुळे त्याने मागणी केलेल्या मागण्या मागणेस तो अशंतःपात्र आहे. त्यामुळे सदर दावा हा खर्चासह अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. सबब वादप्रश्न क्र.०४ चे उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे,

# :: आदेश ::

०१. वादीचा दावा खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

०२. असे जाहीर करण्यात येत आहे की, दावा मिळकतीत वादीचा १/३, प्रतिवादी क्र.०१ ते ०५ यांचा १/१५ प्रत्येकी व प्रतिवादी क्र.०६ हिचा १/३ हिस्सा आहे.

०३. वादी यास दावा मिळकतीतील त्याचा हिस्सा ताब्यात मिळेपावेतो सदर आदेशापासून ताबा मिळेपर्यंतची दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २० नियम १२ प्रमाणे दरम्यानच्या उत्पन्नाबाबतची चौकशी करण्यात यावी.

०४. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

सही/-<br>
( दस्तगीर रा. पठाण )<br>
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),<br>
शिंदखेडा.

दिनांक : १०/०४/२०१९<br>
स्थळ : शिंदखेडा.

<u>प्रमाणपत्र</u>

मी, प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | आर. व्ही. पाटील. |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,शिंदखेडा. |
| पी.डी.एफ.फाईल अपलोड केल्याचा दिनांक | : | १०/०४/२०१९. |

स्वाक्षरीत/-
लघुलेखक.